आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३ वाजता

२७ एप्रिल २०२४ -शनिवार

सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांसाठी आता प्रचाराला आणखी वेग आला आहे. प्रमुख राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते प्रचार सभांसाठी संपूर्ण देश पिंजून काढत आहेत. प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांची आज कोल्हापुरात सभा होणार आहे.

महायुतीचे कोल्हापूर मतदारसंघातले उमेदवार संजय मंडलिक आणि हातकणंगले मतदारसंघातले उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचारासाठी ही सभा होणार आहे.

काँग्रेसच्या महासचिव प्रियंका गांधी आज लातूर जिल्ह्यात उद्गीर इथं महाविकास आघाडीचे उमेदवार शिवाजी काळगे यांच्या प्रचारासाठी सभा घेणार आहेत.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातल्या ८ मतदारसंघात मिळून अंदाजे सरासरी ५९ पूर्णांक ६३ शतांश टक्के मतदान झालं असल्याची माहिती निवडणूक कार्यालयाने दिली आहे. सर्वाधिक ६२ पूर्णांक ६५ शतांश टक्के मतदान वर्ध्यात झालं. सर्वात कमी ५७ टक्के मतदानाची नोंद यवतमाळ-वाशिम मतदारसंघात झाली. बुलढाणा मतदारसंघात ५८ पूर्णांक ४५ शतांश टक्के तर, अकोला मतदारसंघात ५८ पूर्णांक ९ शतांश टक्के मतदान झालं. हिंगोलीत ६० पूर्णांक ७९ शतांश टक्के तर अमरावतीमधे ६० पूर्णांक ७४ शतांश टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. नांदेडमधे ५९ पूर्णांक ५७ शतांश टक्के तर परभणीत ६० पूर्णांक ९ शतांश टक्के मतदान झालं.

<><><><>

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी राज्यातल्या चौथ्या टप्प्यातल्या मतदानासाठीच्या उमेदवारी अर्जांची छाननी काल झाली. यासाठी  ४४७ उमेदवारांनी ६१८ अर्ज केले होते. छाननीनंतर नंदुरबार लोकसभा मतदारसंघात १६,  जळगाव - २०, रावेर - २९, जालना - ३५, औरंगाबाद - ४४, मावळ - ३५, पुणे - ४२, शिरूर - ३५, अहमदनगर - ३६, शिर्डी - २२ आणि बीड लोकसभा मतदारसंघात ५५ असे एकूण ३६९ उमेदवारांचे अर्ज वैध  ठरल्याची माहिती मुख्य निवडणूक कार्यालयाने दिली.  राज्यात  चौथ्या टप्प्यातलं मतदान १३ मे रोजी होणार आहे.

<><><><>

मुंबई उपनगर जिल्ह्यात मतदान जनजागृतीसाठी जिल्हा निवडणूक प्रशासन यंत्रणेनं १ मे रोजी सायकल रॅलीचं आयोजन केलं आहे. वांद्रे इथल्या उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाहून सकाळी साडेसहा वाजता ही रॅली सुरु होईल. स्वीप उपक्रमाच्या माध्यमातून ही रॅली होणार आहे. ऑनलाइन नोंदणीच्या माध्यमातून या रॅलीत सहभागी होता येणार आहे. मुंबईत येत्या २० मे रोजी मतदान होणार आहे.

<><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण उस्मानाबाद लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

कांद्यावरची निर्यातबंदी काही प्रमाणात केंद्र सरकारने शिथिल केली आहे. बांगलादेश, संयुक्त अरब अमिरात, भूतान, बहारीन, मॉरिशस आणि श्रीलंका या सहा देशांमधे ९९ हजार १५० मेट्रिक टन कांद्याची निर्यात करायची परवानगी सरकारनं दिली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत २०२३-२४ या वर्षात खरीप आणि रब्बी पिकांचं उत्पादन कमी असल्याच्या अंदाजाच्या तसंच आंतरराष्ट्रीय बाजारात मागणी वाढल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतल्याची माहिती शासनानं जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात दिली आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दोन सामने होणार आहेत. पहिला सामना मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर दुपारी साडेतीन वाजता रंगणार आहे. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी मुंबई इंडियन्सला आजच्या सामन्यासह सर्व सामने जिंकणं गरजेचं आहे. तर दुसरा सामना संध्याकाळी साडे सात वाजता लखनौ सुपर जायंट्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात लखनौत भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे.

मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावरच्या आंब्यांची विक्री ई-टेंडर पद्धतीनं झाली. विद्यापीठाला यंदा या विक्रीतून १ कोटी ६३ लाखांहून अधिक महसूल मिळाला. महसुलात गेल्या वर्षीपेक्षा वाढ झाली आहे. आंबा बागांचं खत व्यवस्थापन करून उत्पादनात वाढ केल्यानं तसंच विक्री पद्धतीत बदल केल्यानं महसूल वाढला, अशी माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांनी दिली.

**<><><><><>**

अवैध धंद्यांविरोधात भंडारा जिल्ह्यात पोलिसांचं छापा सत्र सुरू आहे. या मोहिमे अंतर्गत तुमसर उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी गोबरवाही इथं हातभट्टीवर छापा टाकून ४ लाख ५३ हजारांचा मुद्देमाल नष्ट केला.

//<><><><><>//